
# ऑयकॉस



प्रेरणा

विनया वाळिंबे

एकदा मी व माझी मैत्रीण विजू (स्वाती गोळे) ए.आर.आय.च्या टेकडीवर फिरायला गेलो होतो. दोन नवीन ऑर्कीड्स पाह्यली. खाली उतरलो. गाडीत बसलो तेवढ्यात विजूचा मोबाईल किणकिणला. विजू म्हणाली, 'अगं तुम्ही दारे खिडक्या लावलीत? आणि सापाला धरलेत कां? खवले, रंग, जात, कूळ सगळं पाह्यलं? आणि मित्राला फोन केलास कां, ठीक आहे. चालेल.'

विजूने मोबाईल बंद केला पण ते संभाषण ऐकून माझी धडधड बंद पडायची वेळ आली. साप न पाहताच मी गारीगार झाले. कारण केतकी व मानसी खानापूरच्या बंगल्यात अभ्यास करताना तेथे साप आला होता व त्यांनी त्याचा पूर्ण पत्ता शोधण्यासाठी त्याला नीट धरले होते. या शूर वीर बालिका कोण? कशा असतील? काय करतात? हे पाहण्याचा मोह अनावर झाला होता आणि मी इकॉलॉजिकल सोसायटीतर्फे हिमालयाच्या ट्रेकला गेले तेव्हा केतकीची गाठ पडली.

मग काय केतकी घाटे आणि मानसी करंदीकर यांच्याशी दिलखुलास चर्चा, गप्पा आणि विचारांची देवघेव सुरू झाली. केतकीला विचारले, 'हे ऑयकॉस काय आहे? याचा अर्थ काय? हेच नाव का? तुमच्या सर्व्हिसेस काय? कसं सुचलं हे काम?'

केतकी म्हणाली, 'ऑयकॉस हा मूळचा ग्रीक शब्द आहे. याचा अर्थ होम,घर किंवा सरळ सरळ पृथ्वी. इकॉलॉजीतला इको हा शब्द ऑयकॉसपासून आला आहे. इकॉनॉमी, इकॉलॉजी हे शब्दही असेच आले आहेत. पर्यावरणाशी संबंधित काम व निसर्गाशी जवळीक या हेतूने आम्ही 'ऑयकॉस' नावाने कन्सल्टन्सी सुरू केली. पृथ्वीशी संबंधित असलेले काम. जमिनीचे पर्यावरणाच्या दृष्टीने नियोजन करणे हा मूळ हेतू आहे. यामध्ये निसर्ग, जैवविविधता, नैसर्गिक स्त्रोत (एनर्जी), निसर्ग संरक्षण व निसर्ग संवर्धन हे सर्व साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

याची योजना आम्ही तीन भागांत केली आहे. एक म्हणजे नॅचरल रिसोर्सेस मॅनेजमेन्ट (निसर्ग व्यवस्थापन), जंगल सुधारणे किंवा आता जी जंगले नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्यांचे पुनरुज्जीवन करणे. या जंगलांचा ऱ्हास होत चालला आहे. कोणत्याही प्रोजेक्टच्या चिरंतन विकासाच्या दृष्टीने रिसोर्सेस राखणे हा एक महत्त्वाचा भाग आहे.

दुसरा भाग किंवा टप्पा म्हणजे इकॉलॉजिकल लॅन्डस्केपिंग करणे. म्हणजे जमिनीचे सुशोभीकरण करणे. ते करत असताना त्यात आम्ही फक्त आपल्याकडचीच झाडे लावतो. त्यांना इंडिजीनस प्लॅन्ट असे म्हणतात. कारण त्या झाडांची वाढ तेथेच त्यांच्या ओरिजिनल प्रदेशात चांगली होते, त्यांना फार इनपूटस् द्यावे लागत नाहीत. देशी झाडे सहज उपलब्ध होतात. कणखर असतात. त्यांचे स्थानिक प्राणिजीवनाशी ॲसोसिएशन असते. ते जपायला मदत होते. एनर्जी व रिसोर्सेस अगदी फ्रेन्डली असतात. त्यांना वाढवण्यासाठी कमी शक्ती खर्च होते. उदा. लॉन केले तर पाणी, वीज, माणूस यांचा खर्च जास्तच होतो. त्यापेक्षा आपण काही वेगळं करू शकू का? असा मी व मानसीनं विचार केला. म्हणजे तेथे फक्त हिरवळ किंवा लॉन न ठेवता त्या जागेवर जिवंतपणा, आणता येईल का, याचा अभ्यास केला व त्यासाठी प्रयत्न केला.'

मी तर ऐकून स्पेलबाऊंड होत होतेच. पण तरीही उत्सुकता शिगेला पोचली होती. केतकी सांगत होतीच, 'समजा एखाद्या बंगल्याचे आवार आहे आणि तेथे आपल्याला फुलपांखरे येणे आवश्यक आहे असे वाटत असेल तर, कोणत्या झाडांवर कोणती फुलपाखरे येतात हे माहीत असल्याने तीच झाडे लावतो. आम्ही तसाही अभ्यास केला आहे. यामुळे दोन हेतू साध्य होतात. आपल्या घराभोवती सुशोभितता, प्रसन्नता तर येतेच वर फुलपाखरांचे संवर्धन होते व जिवंतपणा येतो. आणि हेच काम मोठ्या प्रमाणात करताना निसर्ग संवर्धन, समतोल, प्रदूषण सर्वच साधले जाते.

कुरकुंभ येथे सिप्ला फॅक्टरीच्या आवारात अशा प्रकारच्या प्रकल्पाचे आम्ही प्लॅनिंग करून दिले आहे. तेथे सावलीसाठी कदंबाची झाडे व सिसू आणि करंजासारखी डौलदार, नेहमी हिरवीगार राहणारी झाडे रस्त्याच्या कडेला लावली आहेत. तसेच मनोहर दिसणारी बहावा, पळस, ऋतुमानाप्रमाणे फुलणारी शोभेची झाडेपण घेतली आहेत. लॉन एरिया कमी करून, सिझनल बेडस् केले आहेत व काही ठिकाणी तळी ठेवली आहेत. जेथे पक्षीही आकर्षित होतील.'

यापेक्षा तिसरा वेगळा प्रकल्प काय आहे, हे सांगताना केतकी म्हणाली, 'इकोटूरिझम' म्हणजे पर्यावरण साधून केलेले पर्यटन. दिवसेंदिवस बर्ड सॅक्च्युअरी, नॅशनल पार्क येथे टूरिझम, म्हणजेच पर्यटन जास्त होत चालले आहे. खरं म्हणजे हा भाग नॉन ह्यूमन बीईंग करता असावा व हे भाग संरक्षित राहाण्यासाठी मानवजातीसाठी वेगळी पर्यटनस्थळे करीत आहोत. त्यालाच इको टूरिझम सेन्टर्स म्हणायला हरकत नाही.'

यात अगदी सुरुवातीपासून थीम ठरवून, लोकल मटेरियल वापरण्यापर्यंत सर्व आम्ही ठरवतो. उदा. बाम्बू, कारवी यांचाच वापर करून बांधकाम. तसेच तेथील स्थानिक लोक काय खातात. (म्हणजे तेथे जास्त काय पिकते) उदा. नाचणीची भाकरी, भारंगीची भाजी, कुर्डूच्या पाल्याची किंवा रताळ्याच्या पाल्याची भाजी हेच पदार्थ खायला देतो. हे शहरी लोकांना माहीत नसतात. पण त्याची न्यूट्रीशनल व्हॅल्यू आहे हेही कळते. व त्यातून स्थानिक लोकांना उत्पन्न व त्यांचा आमच्या कामात सहभाग हाही उद्देश आहे.

यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनोरंजनासाठी टूरिझम रिक्रीएशन विथ एज्युकेशन पण आहे. वेगवेगळे साईन बोर्डस् वापरून तेथील प्राणी, पक्षी, वनस्पती यांची माहिती दिली जाते. पुण्याच्या जवळ पिरंगुट येथे 'मयुरबन नेचर पार्क' मध्ये हे काम चालू आहे. येथे आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे तीन ट्रेल केले आहेत.

एक प्लॅन्ट ट्रेल. यात वनस्पतींची माहिती मिळेल किंवा झाडे पाहायला मिळतील. दोन बटर फ्लाय ट्रेल्स. यात फुलपाखरांचे जीवनचक्र त्यांची माहिती व प्रत्यक्षही पाहायला मिळतील. तिसरा बर्ड ट्रेल. त्या भागात दिसणारे पक्षी, त्यांचे नेस्टींग, रुस्टींग, हॅबीटॅट काय? त्यांचे अन्न काय? ही माहिती पण तेथील बोर्डवर किंवा कधी कधी प्रत्यक्षही पाहायला मिळेल. तेथे घरट्यांची मॉडेल्सही असतील. या प्रकारचा प्रकल्प कदाचित पहिलासुद्धा असू शकेल.

पर्यटकांना निसर्ग वेगळ्या पद्धतीने दाखवता यावा व निसर्गाविषयी जाणीव, जागृती व्हावी, बरोबर आनंद व ज्ञान, हे उद्देश आहेत. नुसती हिरवळ किंवा धबधब्याचे पाणी पाहून हुरळून न जाता आपला निसर्ग कसा जपता येईल, तेव्हा हा पुढच्या पिढीसाठी वारसा ठेवण्याचा आमचा शुद्ध हेतू आहे.' माणूस हव्यासापोटी निसर्ग ओरबाडत आहे, विध्वंस करत आहे. तो थांबवण्याचा, कमी करण्याचा व निसर्गाचा ठेवा तसाच ठेवण्याचा मानस मानसीने बोलून दाखवला.

आतापर्यंत ऑयकॉसचे असे २० ते २२ प्रोजेक्ट झाले आहेत. सांगली, कोकण, गोवा, सातारा, पुणे, माथेरान आणि आता राजस्थानातील वाळवंटातील प्रकल्प मिळाला आहे. मानसी म्हणाली, 'आम्ही तेथे रूट झोन सिस्टीम इन्स्टॉल करतो आहोत. यामध्ये झाडे वापरून सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते व ते पाणी रिसायकल करून बागेला, झाडांना, स्वच्छतेला वापरता येते. असा प्रकल्प मी मस्कतला पाह्यल्याचे आठवत होते आणि राजस्थानमध्ये हे काम सुरू झाले आहे.'

आज पर्यावरणाच्या क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग करणारी केतकी बॉटनी व केमेस्ट्री घेऊन बी. एस्सी. झाली आहे. तसेच एम. एस्सी. एनव्हायरॉनमेन्ट पुणे विद्यापीठात केले आहे. तर मानसी इन्स्ट्रूमेन्टेशन इंजिनियर आहे. या दोघींनी प्रकाश गोळे, स्वाती गोळे यांच्या इकॉलॉजिकल सोसायटीचा नॅचरल रिसोर्सेस मॅनेजमेंन्ट व सस्टेनेबल डेव्हलपमेंट हा एक वर्षाचा कोर्सही केला आहे.

भरपूर माहितीसकट फील्ड वर्कचाही अनुभव दोघींनी त्या अभ्यासक्रमात घेतला. केतकी सांगत होती. 'प्रकाश गोळे यांचे पहिले लेक्चर ऐकले तेव्हाच याचा प्रॅक्टीकली उपयोग करावा असा परस्पेक्टिव्ह मिळाला व स्वतःची फर्म काढावी असं दोघींना सुचलं. मानसीला थोडा अनुभव होता कारण मानसीने Wild नावाच्या संस्थेत काम केले होते- ज्या संस्थेने नागपंचमी बंद केली, नाग पकडणे व वाघ वाचवणे ही मोहीम काढली, तेथे मानसीने व्हॉलेन्टीअरचे काम केले होते. आमच्या दोघींची विचारांची व अनुभवाची वेव्हलेन्थ जुळली आणि कोर्स पुरा करत असतानाच हळूहळू आम्ही स्वतः कामाला सुरुवात केली. समसमः म्हणून हे शक्य झाले. खरं तर मी चाळीसगावहून पुण्याला आले होते ती नाटकाचं वेड डोक्यात घेऊन. पण या अभ्यासक्रमाने माझी दिशाच बदलली.

आम्ही लोकांपर्यंत पोचण्यासाठी प्रदर्शनात भाग घेतो. expo, किसान, ॲग्रो एक्झिबिशन यातसुद्धा थीम ठरवूनच काम करतो. महाराष्ट्राचे सहा भौगोलिक भाग आहेत. त्याप्रमाणे कोकण, सह्याद्री, मराठवाडा, विदर्भ, तेथील मूळची झाडे, वनस्पती कोणत्या त्याचा अभ्यास करून रोपे तयार करतो. पोस्टर्स करून देशी व परदेशी झाडांची माहिती देतो. यातून आम्ही लोकांपर्यंत पोचलो. परंतु कोणतेही प्लॅन्टेशन करताना 'देशी झाडे लावा' हे आम्ही आवर्जून सांगत असतो. त्यासाठी अभ्यास करून ॲल्टरनेटिव्ह किंवा सबस्टिट्यूट झाडे पण शोधली आहेत. उदा. शेतकऱ्यांच्या करीता फ्युअल वूड किंवा जळणाकरिता भेंड, पळस, इत्यादी. शेतकऱ्यांना उत्पन्न देणारे झाड म्हणजे करंज. बायोडिझेलच्या दृष्टीने लावायला सांगतो. तसेच आयुर्वेदातही औषधे तयार करण्यास करंज तेल व साल वापरतात.'

मानसी म्हणाली, 'हे काम करता करता आम्ही अजून काही नवीन कल्पना व योजना अमलात आणल्या. नक्षत्र वृक्ष, औषधी वनस्पती लावावयास सांगितले. यात अंधश्रद्धा मात्र नाही. परंतु पुन्हा इंडिजीनस झाडे लावणे व संवर्धन असा भाग होता. २७ नक्षत्रे व त्यांची २७ झाडे विकायला पण ठेवली होती. यातच घरगुती औषधी वनस्पतींचा एक भाग करून अडुळसा, वाळा, गवती चहा, तुळस, बेल हेही ठेवले होते.

बायफकरिता आम्ही फिश लॅडर डिझायनिंग कन्सलटन्सी केली. म्हणजे गुजरात व महाराष्ट्रामध्ये डॅमच्या ठिकाणी दोन मीटरची वॉटरशेड डेव्हलपमेंट करून दिली. डॅममुळे जी मोठी भिंत असते तेथे मासे येतात. तेव्हा त्या प्रचंड उंचीच्या भिंतीमुळे त्यांना कोठे जायचे कळत नाही. त्यांची उडी मारण्याची क्षमता जास्तीत जास्त दोन फूट असते. मग ते कमी होतात किंवा मरतात. तेव्हा त्यांची जोपासना, वाढ करण्यासाठी फिश लॅडर डिझायनिंग करून दिले आहे व त्याचा उपयोग होत आहे.'

मी मानसी व केतकी यांच्याकडे कुतूहल संपून आता आश्चर्यचकित होऊन बघत होते. अवघ्या २४, २५ वर्षांच्या या मुलींनी खूपच मोठा पल्ला गाठल आहे. फील्ड वर्कला जाणे, मॅपिंग करणे, प्रोजेक्टबरोबर इतर कामे, खर्च हिशेब यासाठी पण मुलींचीच मदत घेताना दिसल्या. हे क्षेत्र तर वेगळे आहेच पण साधारण वय झाल्यावर सोशल वर्कची वृत्ती असते. कधी कधी मोठेपणा म्हणून पर्यावरणाचे काम करणारे बडे लोक दिसतात. पण या दोघी ऐन तारुण्यात इतकं सुंदर काम करताना पाहून नवल वाटत होतंच.

त्यांना MCCIA चे इनोव्हेशन प्रॉडक्टिव्ह सेरीजचे नवीन उत्पादन व सेवा करताचे ॲवॉर्ड मिळाले आहे. ते इकॉलॉजिकल सर्व्हिसेस करता मिळाले.

ऑयकॉसचं ऑफीससुद्धा वेगळया पध्दतीनं सजवलय. निसर्गात बसलो आहोत असं वाटतं. याचं रहस्य सांगताना मानसी म्हणाली,

'आमच्या ऑफीसमध्ये प्लॅस्टीक व मेटल वापरायचं नाही असं आम्ही ठरवलं. एकदा रिसायकल केलेले मटेरियलच वापरायचे शिवाय ते बायो डिग्रेडेबल असणारे हवे. म्हणून इलेक्ट्रीकच्या वायर्सना वरून बांबूचे कोटींग घेतले आहे आणि फर्निचरला चीपबोर्ड वापरला आहे. चीपबोर्ड स्क्रॅप पासून केलेला असतो. हे स्क्रॅप वूडवेस्टचेच आहे. तसेच पडदे पण बांबूचेच केलेले आहेत. ही रंगसंगती निसर्गाशी जवळीक साधणारी आहे. आम्ही आमच्या इंटीरिअर डिझायनरला या रंगासाठी शेणाच्या गोवऱ्या दाखवल्या होत्या. आमच्या फरशीवरचे लायनिंग आता केरळहून येत आहे.'

हे सांगत असताना मानसीच्या कपड्यांकडे पाहिले तर मानसी व केतकी आधुनिक असल्या तरी शुद्ध कॉटनचे कपडे रोज घालतात. त्याचच प्रतिबिंब त्यांच्या कामाच्या पद्धतीवरही पडलं आहे. मानसी म्हणते, 'आम्ही जाहिरातीपेक्षा माऊथ पब्लीसिटीवर जास्त भर देतो. प्रथम आम्ही साईटला व्हीजिट देतो. त्यांचा सर्व्हे करतो. त्यांची जमीन, जमिनीची कंडीशन, तेथील झाडे, वनस्पती, पक्षी, प्राणी अभ्यासतो. डिग्रेडेशन लेव्हल पाहतो. व मग काय करायचे याचे त्यांना प्लॅनिंग देतो. पुढे डिटेल्स हवे असतील तर प्लॅनिंग नंतर, इम्प्लीमेंटेशन, सर्व्हे व मॉनिटरिंग पण करतो.

आता आमच्या संस्थेला चार वर्षे पूर्ण होऊन बाल्यावस्था म्हणजे रांगणे संपलेले आहे व चालायला लागलोच आहे यात वाद नाही. आम्ही माणसे कायमची अपॉईंट करत नाही. फोटोग्राफर, मार्केटिंग, साईन बोर्ड तयार करणे किंवा काहीही लागेल तशी मदत घेतो. सध्या दोघीच बघत आहोत.

पुढील पाच वर्षात आमचे प्रकल्प जास्त ठिकाणी व्हायला हवेत असे वाटते. सह्याद्री, कोकण, नीलगिरी, सातपुडा, अशा प्रादेशिक वैविधतेचे वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प करण्याचा मानस आहे. तसेच हे प्रकल्प सरकारी क्षेत्र, इंडस्ट्रियल झोन किंवा पर्यावरण क्षेत्र अशा वेगवेगळ्या क्षेत्रात पसरावे असा पुढील पाच वर्षांचा उद्देश आहे. आमची स्वतःचीच देशी झाडांची वेगळी नर्सरी आहे. त्यात आता एकूण १५० झाडे आहेत. ती इतर ठिकाणी मिळत नाहीत, असे लक्षात आल्यावर आमची आम्ही सुरू केली. त्याचा फायदाच झाला आहे. प्रोजेक्ट करता करता या झाडांच्या नर्सरीची गरज लक्षात आली व नर्सरी काढली.'

आमचे काम सोशल व कमर्शिअल याच्या उंबरठ्यावर आहे. SOS (सेव्ह अवर सह्याद्री) असा सोशल ॲक्टीव्हिटी असलेला प्रोजेक्ट पण आम्ही केला. तेथे लोकांना घेऊन जाणे तसेच फुलं किंवा ऑर्किड्स न तोडणे, कचरा न टाकणे, दारूच्या बाटल्या अस्ताव्यस्त न फेकणे, प्लॅस्टीक पिशव्या वस्तू न वापरणे न टाकणे हेही यातून आम्ही सोशल वर्क म्हणून राबवले आहे. तसेच सर्वसामान्य लोकांना निसर्गाची जाणीव करून देण्यासाठी नेचर ॲक्वॅन्टन्स् म्हणजे 'निसर्ग वाचन' हा एक कोर्स आता घेत आहोत. यात आठवड्यातून एक-दोन तास जवळील निसर्गाची चित्रे, भाषणे, माहिती यातून ओळख करून देतो. त्यांना एक महिन्यातून एकदा दिवसभर फील्डवर नेऊन झाडं, पक्षी, प्राणी यांची ओळख किंवा कसे ओळखायचे हेही दाखवतो. त्यांना निसर्गात नेऊन निसर्ग किती महत्त्वाचा घटक आपल्या आयुष्याशी प्रत्येक लहान गोष्टींपासून ते मोठ्यापर्यंत निगडित आहे हे सांगतो. म्हणजे त्याचे महत्त्व पटून तेही निसर्ग संवर्धनाच्यासाठी काम करतील, प्रयत्न करतील अशी मोठी आशा आहे.'

या मुलींशी गप्पा मारता मारता असं लक्षात आलं की, एकीकडे ही इन्फोटेक्नॉलाजी व कॉम्प्युटरचे युग यातील तरुण पिढी.... खुर्चीला खिळून रात्रीचे दिवस व दिवसांच्या रात्री करून, सुग्रास अन्नाचे जेवण सोडून फास्ट फूडच्या मिठीत रममाण झालेली. हातात मोबाईल पण स्वतः इमोबाईल असलेली, तासन् तास फक्त कॉम्प्युटरशीच गप्पा मारणारी पण प्रत्यक्ष संवाद विसरलेली. जगण्याची पद्धती विसरली आहे. हास्याला दुरावली आहे. त्यांनी जरा या निसर्गाशी जवळीक साधावी व आपला विश्वाचा समतोल राखण्यासाठी नैसर्गिक जीवनशैलीकडे वळावे व अर्टिफिशीयल म्हणजे कृत्रिम जगाला बाजूला करण्याचे मनावर घ्यावे तरच पुढे मानव जात शिल्लक राहणार आहे.